# अनेकानेक रूपे आनंदाची

१ जून, २०२०

आत्मीय वाचकांनो,

‘आनंदमय जन्मदिवस’ या महिन्यात आपले स्वागत आहे! ‘आनंद’ हा शब्द या महिन्याला अभिव्यक्त करण्यासाठी अगदी अचूक आहे, जेव्हा आपण आपल्या जीवनातील गुरुमाईंच्या उपस्थितीचा उत्सव साजरा करतो. जून महिन्याचे हे नाव यामुळे पडले आहे की, गुरुमाईंचा जन्मदिवस, जो २४ जून रोजी असतो, त्याचा उत्सव अनेक भक्तगण जून महिना लागताच पहिल्या दिवसापासून साजरा करायला सुरुवात करत. सन २००८ मध्ये, आपल्या जन्मदिवसाच्या काही दिवस आधी, श्रीगुरुमाईंनी श्री मुक्तानंद आश्रमातील काही लोकांना सांगितले : “परमेश्वर तुमच्या अंतरात आहे. तुमचा आनंद बाहेर झगमगू द्या, आज आणि सदैव.”[१] मग त्यानंतरच्या वर्षी श्रीगुरुमाईंनी जूनच्या संपूर्ण महिन्याला ‘आनंदमय जन्मदिवस’ हे नाव दिले. तेव्हापासून, सिद्धयोग्यांनी जून महिन्याचा उल्लेख या सुमधुर आणि उद्‌बोधक नावाने करायला सुरुवात केली, श्रीगुरुमाईंचा सन्मान करण्याचा आणि त्याचबरोबर स्वतःला उन्नत करण्याचा एक मार्ग म्हणून!

आनंद अनेकानेक रूपे धारण करू शकतो—प्रसन्नतेने भरलेली निःस्तब्धता, उल्हासमय उत्साह, नामसंकीर्तनाची आनंदमस्ती, आपण सेवा अर्पण करत असताना अनुभवास येणारी एकाग्रता आणि भक्तिभाव. आनंद हा आदरयुक्त श्रद्धेची भावनाही असू शकतो, जी भगवंताच्या एखाद्या प्रिय स्वरूपाची आरती करताना आपण अनुभवतो. ‘मंदिरात राहा’ या सत्संगांच्या थेट प्रक्षेपणाचे एक वैशिष्ट्य हे आहे की, प्रत्येक वेळी जेव्हा श्री मुक्तानंद आश्रमातील भगवान नित्यानंदांचे मंदिर हे सिद्धयोग वैश्विक हॉलचे केंद्रबिंदू बनते, तेव्हा सत्संगादरम्यान एक अशी वेळ असते, जेव्हा बडे बाबांच्या मूर्तीची आरती केली जाते. माझ्यासाठी, हा अत्यंत आनंददायी आणि अगाध क्षण असतो—तेव्हा पवित्रतेची भावना अगदी स्पष्टपणे जाणवते. कधीकधी आपण आरती गातो, जी बाबा मुक्तानंदांनी त्यांच्या श्रीगुरूंच्या सन्मानार्थ संकलित केली आहे; कधीकधी आपण ‘ज्योत से ज्योत जगाओ’ किंवा इतर प्रार्थनाही गातो. आरतीच्या वेळी नेहमी, एक किंवा त्याहून अधिक पुजारी तुपाच्या प्रज्वलित निरांजनांनी बडे बाबांच्या मूर्तीची आरती करतात. प्रकाशाचे तसेच त्याबरोबर

उदित होणाऱ्या नाजुक-मखमली धुराचे हे अर्पण मला प्रेमाच्या आणि प्रशांतीच्या भावनेमध्ये खेचून नेते—आणि एका अशा शांतिमय जाणीवेत नेते, की सर्वकाही ठीक आहे.

'मंदिरात राहा' या सत्संगांमधील प्रत्येक आरतीचे समापन एका सुंदरशा विधीने केले जाते, ज्यामध्ये पुजारी कापराचा छोटा तुकडा पेटवून तो आरतीच्या दिव्याच्या मध्यभागी किंवा तबकाच्या मध्यभागी ठेवतात आणि मग त्या कापरातून उत्पन्न होणाऱ्या धूम्रवलयांना ते प्रेमपूर्वक आपल्या हाताने बडे बाबांच्या मूर्तीच्या दिशेने प्रवाहित करतात—एक अखेरचे, सौम्य अर्पण. या पूजेचा एक भाग म्हणून आपण दोन श्लोक गातो, जे कर्पूर आरतीच्या वेळी आपल्या कंप्यूटरवरील स्क्रीनच्या खालच्या बाजूला दाखवले जातात. या वैदिक श्लोकांना कर्पूर आरती असे म्हणतात. या संपूर्ण पूजाविधीच्या समापनाचे वर्णन स्वामी ईश्वरानंद आणि अमी बन्सल यांनी "*Krpa ka Jharana:* The Waterfall of Grace, Part IX" अशा शीर्षकाखाली अनेक वर्षांपूर्वी लिहिले आहे जे वर्ष २०१४च्या गुरुपौर्णिमा महोत्सवाच्या अंतर्गत वेबसाइटवर प्रकाशित झाले आहे.

हे स्पष्ट आहे की, सध्याच्या जागतिक संकटाच्या काळात या आरत्या म्हणजे आपल्यासाठी गुरुमाईंची कृपा आणि त्यांचे आशीर्वाद यांचे चैतन्यमय प्राकट्य आहेत. या सत्संगांदरम्यान श्रीगुरुमाईंनी दिलेल्या विपुल व प्रेरणादायी शिकवणींमधूनदेखील त्यांची कृपा प्रकट आहे. यांतील प्रत्येक असामान्य प्रवचन हे दोन्ही गोष्टींनी ओतप्रोत भरलेले आहे : या आव्हानात्मक परिस्थितीमध्ये गुरुमाईंना आपल्याविषयी वाटणारी अपार करुणा तसेच त्यांचा याविषयी विशेष आग्रह की, या कठीण काळातून धीराने आणि सामर्थ्याने वाटचाल करत असताना आपण आपली आंतरिक स्थिती शांत ठेवावी. हे करण्यासाठी ज्या एका मार्गाची शिफारस गुरुमाईंनी केली आहे तो मार्ग आहे, आपण 'सद्‌गुण वैभव'चे अध्ययन करण्यावर तसेच त्याचे मूर्तरूप होण्यावर एकाग्र व्हावे—ते दिव्य सद्‌गुण जे गुरुमाईंनी 'आनंदमय जन्मदिवस' या महिन्यासाठी आपल्याला प्रदान केले आहेत. मी तुम्हाला यासाठीही प्रोत्साहित करतो की, 'मंदिरात राहा' या प्रवचनांपैकी प्रत्येक प्रवचनाचे अध्ययन तुम्ही करावे—आणि आनंदमय जन्मदिवसाच्या या महिन्यासाठी आधारभूत अभ्यास म्हणून तुम्ही विशेषकरून 'सद्‌गुणांना कार्यरत करणे' या प्रवचनाचे अध्ययन करावे.

## वेबसाइटवर ‘आनंदमय जन्मदिवस’ याचे अन्वेषण

‘आनंदमय जन्मदिवसा’च्या या उत्सवादरम्यान सिद्धयोग मार्गाच्या वेबसाइटवर अनेकानेक खजिने उपलब्ध आहेत, आणि प्रत्येक खजिना आपापल्या तऱ्हेने अत्यंत मौल्यवान आहे. प्रत्येकाचे स्वतःचे सौंदर्य आहे, स्वतःची वेधकता आहे, प्रत्येकाची शिकवण देण्याची स्वतंत्र शैली आहे—आणि यातील प्रत्येक गोष्ट केवळ जून महिन्यातच उपलब्ध असते.

### सद्‌गुण वैभव

गेली अनेक दशके गुरुमाईंनी आपल्याला—म्हणजेच त्यांच्या विद्यार्थ्यांना—हे शिकविले आहे की आपण दिव्य सद्‌गुणांना आपल्या जीवनात उतरवून या जगात आपली दिव्यता प्रकट करावी. ‘आनंदमय जन्मदिवसा’च्या या संपूर्ण महिन्यात प्रत्येक दिवशी ‘सद्‌गुण वैभव’ या गॅलरीत एक नवीन सद्‌गुण पोस्ट केला जाईल. वेबसाईटवरील ही पृष्ठे महिन्यातील प्रत्येक दिवशी असा विषय प्रदान करतात ज्यायोगे तुम्ही मनःपूर्वक, पूर्ण हृदयाने त्या विषयावर चिंतनमनन करू शकाल, त्याच्याशी संलग्न होऊ शकाल—आणि सद्‌गुणांच्या अभ्यासाला अधिक सखोल करण्यासाठी हा एक परिपूर्ण मार्ग आहे. आपल्या शब्दांतून आणि कृतींमधून सद्‌गुण व्यक्त करण्याद्वारे आपण या जगतात आपल्यातील दिव्य सारतत्त्व प्रकट करत असतो जेणेकरून अनेकांचे कल्याण व्हावे. मला असे आढळून आले आहे की, ही गॅलरी केवळ पाहिल्याने आणि काही क्षणांकरता प्रत्येक सद्‌गुणाला आपल्या बोधामध्ये धारण केल्याने, सद्‌गुणांविषयीचा माझा आदरभाव तसेच जीवनामध्ये या गुणांचे प्रत्यक्ष मूर्तरूप बनण्याची माझी इच्छा पुन्हा जागृत होते. प्रत्येक दिवसाच्या नवीन सद्‌गुणासोबत काही वेळ घालवण्याव्यतिरिक्त, तुम्ही त्याविषयी जर्नलमध्ये लिहू शकता, ज्यायोगे तुम्ही त्या सद्‌गुणाला तुमच्या हृदयात आणि मनात खोलवर उतरण्यास आमंत्रित करू शकता आणि तुमच्या दैनिक जीवनाशी त्याला एकरूप करू शकता.

### सद्‌गुणांवरील भाष्ये

सद्‌गुणाच्या पोस्टसोबत, बऱ्याचशा दिवशी त्या दिवसाच्या सद्‌गुणावरील भाष्याचाही अंतर्भाव केला जाईल, जे भाष्य अशा सिद्धयोग विद्यार्थ्याने लिहिलेले असेल ज्याने स्वतःच्या जीवनात त्या सद्‌गुणाचे अध्ययन व अभ्यास केला आहे. या भाष्यांचे वाचन करणे आणि त्यांवर मननचिंतन करणे हा एक उत्कृष्ट मार्ग आहे, दिव्य सद्‌गुणांशी असलेल्या आपल्या स्वतःच्या संबंधाला प्रेरित करण्याचा आणि चैतन्यमय बनविण्याचा.

### Chanting with Gurumayi [श्रीगुरुमाईंसमवेत नामसंकीर्तन]

काय छान मेजवानी आहे ही! श्रीगुरुमाईंसमवेत नामसंकीर्तन हा एक अनोखा व्हिडिओ आहे ज्यामध्ये गुरुमाईंसोबतच्या निरनिराळ्या नऊ नामसंकीर्तनांचे अंश आहेत. तुम्ही यांपैकी प्रत्येक संकीर्तनासोबत गाऊ शकता आणि संकीर्तनानंतर मधुर ध्यानावस्थेत स्वतःला लीन करू शकता.

### Reflections on Gurumayi

Reflections on Gurumayi Chidvilasananda [गुरुमाई चिद्विलासानन्द पर मनन]
हे सदर गुरुमाईंनी विद्यार्थ्यांना अनेक मार्गांनी वैयक्तिकरित्या दिलेल्या शिकवणींची चित्तवेधक आणि प्रेरणादायी झलक आपल्याला दाखवते, स्वतः त्या विद्यार्थ्याने आपल्या दृष्टिकोनानुसार यातील प्रत्येक मनन-अनुभवाचे कथन केले आहे. वैयक्तिक चिंतनांच्या, कवितांच्या आणि गुरुमाईंविषयीच्या अनुभवांच्या तसेच त्यांच्या शिकवणींच्या या समृद्ध संग्रहामध्ये, तुम्हाला भरपूर प्रमाणात बोधकथा मिळतील आणि त्या अंतर्दृष्टीही मिळतील ज्यांची नोंद तुम्ही स्वतःच्या जर्नलमध्ये करू शकाल आणि मग आगामी वर्षादरम्यान तुम्ही पुन्हा त्यांकडे वळू शकाल.

### श्रीगुरुमाईंचे दर्शन आणि प्रज्ञान

गुरुमाई चिद्विलासानंद यांचे दर्शन आणि प्रज्ञान— गुरुमाईंच्या छायाचित्रांच्या या सुंदर संकलनात एक हर्षदायी रहस्य दडले आहे. गुरुमाईंच्या कोणत्याही एका छायाचित्रावर क्लिक करा आणि त्यांची एक शिकवण वाचा! या दालनामध्ये तेहतीस छायाचित्रे गुरुमाईंच्या शिकवणींसह आहेत; तेव्हा तुम्ही, महिन्याच्या प्रत्येक दिवशी निदान एक तरी छायाचित्र पाहू शकता आणि त्यातील शिकवण वाचू शकता! तुम्हाला कदाचित असेही आढळेल की, तुमचे हृदय आणि मन एखाद्या विशिष्ट शिकवणीला विशिष्ट असा सखोल प्रतिसाद देते आहे किंवा त्या शिकवणीकडे खेचले जाते आहे, तेव्हा ती शिकवण तुमच्या बोधात संपूर्ण महिनाभर धारण करावी असे जर तुम्हाला वाटत असेल, तर तसे अवश्य करा!

### सिद्धयोग यंत्र

यंत्रे ही देवतांच्या दृश्यमान आणि गूढ प्रतिमा आहेत. गुरुमाईंनी सिद्धयोग यंत्राची निर्मिती ‘आनंदमय जन्मदिवसा’साठी केली आहे; जेव्हा आपण आपला बोध या यंत्रात निमग्न करतो, तेव्हा आपले मन निःस्तब्ध होते आणि आपण अंतरातील दिव्यतेच्या अनुभूतीप्रति ग्रहणशील बनतो. तुम्ही या सिद्धयोग यंत्रावर जसजसे चिंतन कराल, तसतसे तुमच्या डोळ्यांना

हळुवारपणे यंत्रातील प्रत्येक घटकाची गतिशीलता आणि निश्चलता आत्मसात करू द्या, व त्याचबरोबर समग्र यंत्रालादेखील आत्मसात करा. स्वतःला यामध्ये निमग्न करा आणि पाहा की, हे यंत्र तुमच्या आंतरिक स्थितीला कसे प्रभावित करते आहे. तुम्ही याला तुमच्या जीवनात सामावून घेण्यासाठी रचनात्मक मार्गांचे अन्वेषण करण्याचा विचारही करू शकता!

**सुरभी, स्मरण, अभिज्ञान**

हा श्रीगुरुमाईंच्या जीवनावरील व शिकवणींवरील चिंतनमननांविषयीच्या नऊ पैलूंचा एक संग्रह आहे, ज्याचे शीर्षक आहे, 'सुरभी, स्मरण, अभिज्ञान : गुरुमाई चिद्विलासानंद यांचे जीवन आणि त्यांनी प्रदान केलेला दिव्य वारसा'. आनंदमय जन्मदिवसाप्रीत्यर्थ लिहिले गेलेले, गुरुमाईंच्या जीवनाचे व वारश्याचे हे एक आनंदमय व अगाध असे यथार्थ दर्शन आहे, जे श्रीगुरुमाईंच्या समवेत अनेक वर्षे राहत असलेल्या नऊ सिद्धयोग विद्यार्थ्यांना त्यांच्या दृष्टीद्वारे आणि हृदयाद्वारे झाले आहे.

## श्रीगुरुमाईंच्या नववर्ष-संदेशाचे अन्वेषण आणि अध्ययन

अलीकडे, मी यावर चिंतन करत राहिलो आहे की, गुरुमाईंच्या वर्ष २०२०च्या नववर्ष-संदेशाचे अध्ययन व अभ्यास करताना कोणत्या पद्धतींचा अबलंब करावा, ज्या माझ्या साधनेला तसेच माझ्या दैनंदिन जीवनातील सर्व पैलूंना साहाय्यक होतील. नववर्ष-संदेशाचे अध्ययन व अभ्यास करण्याच्या अशा प्रकारच्या दृष्टिकोनातील सौंदर्य हे आहे की, याने माझा बोध दिवसभर संदेशाशी खिळून राहतो आणि आनंद व प्रशांतीच्या भावनेने मला अनवरतपणे ओतप्रोत करत राहतो; 'आत्मा की प्रशान्ति'—गुरुमाईंच्या या नववर्ष-संदेशाच्या बोधाचा विकास व त्याची अनुभूती करण्याचा हा एक उत्तम मार्ग आहे.

एक गोष्ट जी माझ्या लक्षात आली आहे, ती म्हणजे गायनाचे महत्त्व—आणि कोणतीही गाणी नव्हेत, तर ईशस्तोत्रे आणि ईश्वराच्या नामाचे गायन. मला जेवढे आठवते त्यानुसार, माझी पत्नी आणि मी दररोज संध्याकाळी आमच्या ध्यानाच्या अगोदर नामसंकीर्तन करतो आणि या वर्षाच्या पहिल्या दिवसापासून आम्ही दररोज सकाळच्या ध्यानापूर्वीदेखील आनंददायक असे कुंडलिनीस्तवः गातो आहोत. मला असे आढळून आले आहे की, ध्यानापूर्वी केलेले हे गायन माझ्या मनाला शांत करते आणि माझ्या बोधाला हृदयात, आत्म्यामध्ये स्थिर करते. आणि मग, गायन संपल्यावर मी जेव्हा ध्यानाला सुरुवात करतो, तेव्हा मी ध्यानात उतरलेलाच असतो.

मी याचा उल्लेख तुम्हाला प्रोत्साहित करण्याचा एक मार्ग म्हणून करतो आहे, जेणेकरून तुम्ही गुरुमाईंच्या नववर्ष-संदेशाला तुमच्या जीवनात कार्यान्वित करण्याचे मार्ग शोधत असताना रचनात्मक बनावे, आणि प्रसंगी खेळकरदेखील बनावे.

## अन्य उत्सव

### कबीर जयंती—५ जून

पंधराव्या शतकातील संतकवी कबीर यांची जयंती हिंदू पंचांगानुसार ज्येष्ठ महिन्यातील पौर्णिमेला साजरी केली जाते. संत कबीरांच्या कार्याचे प्रमाणचिन्ह म्हणजे त्यांनी लिहिलेले 'दोहे', म्हणजेच दोन ओळींच्या काव्यरचना; दोह्यामध्ये गहन सत्य एका विलक्षण प्रतिमेद्वारे स्पष्ट केलेले असते. 'गुरु गोविन्द दोऊ खड़े' या दोह्यामध्ये संत कबीरांनी लिहिले आहे, "माझे सद्‌गुरू आणि भगवंत दोघेही माझ्यासमोर उभे आहेत. मी आधी कोणाच्या चरणांना वंदन करू? हे सद्‌गुरो, मी तुमच्याप्रति स्वतःला पूर्णपणे समर्पित केले आहे. तुम्ही मला भगवंताचे दर्शन करवून दिले आहे."

### ग्रीष्मकालीन व शीतकालीन संक्रांती [अयनदिन]—२० जून

उत्तर गोलार्धात, ग्रीष्मकालीन संक्रांती [अयनदिन] हा वर्षातील सर्वात मोठा दिवस असतो. दक्षिण गोलार्धात, याच दिवसाला शीतकालीन संक्रांती [अयनदिन] म्हणून ओळखले जाते — आणि तो वर्षातील सर्वात लहान दिवस असतो. तुम्ही कोठेही जरी राहत असलात, तरी अनेक संस्कृतींमध्ये आणि अनेक धर्मांमध्ये हा दिवस आपल्या जीवनाला महत्त्वाचे वळण देणारा दिवस मानला जातो.

### फादर्स डे [पितृ दिवस] —२१ जून

अनेक देशांनी, वडलांचा सन्मान करण्यासाठी एक दिवस राखून ठेवला आहे आणि सर्वसामान्यपणे हा उत्सव जून महिन्यातील तिसऱ्या रविवारी साजरा करण्याची प्रथा आहे. आपल्या वडलांनी आणि वडिलकी निभावणाऱ्या व्यक्तींनी आपल्या जीवनात बजावलेल्या अनेक भूमिकांचा उत्सव आणि सन्मान करण्याचे स्मरण आपल्याला 'फादर्स डे' प्रत्येक वर्षी करवून देतो. ते आपले संरक्षक, पालनकर्ते असतात आणि आपण मोठे होत असताना ते आपला आदर्श असतात; आणि आपण जर भाग्यवान असलो, तर ते आपले सुज्ञ मार्गदर्शकही असतात जे आपल्याला सर्वोत्तम बनण्यास साहाय्य करतात. 'फादर्स डे' हा एक उत्कृष्ट समय

आहे आपल्या वडलांचे तसेच वडिलकी निभावणाऱ्या व्यक्तींचे स्मरण करण्याचा, त्यांचा सन्मान करण्याचा आणि त्या सर्व गोष्टींचेही स्मरण करण्याचा ज्या आपण त्यांच्याकडून शिकलो आहोत आणि त्यांच्याकडून आपल्याला प्राप्त झाल्या आहेत.

***

आपण सर्वजण जाणतोच की, गुरुमाईंच्या कृपेचे माध्यम म्हणून सिद्धयोग मार्गाची वेबसाइट उत्तरोत्तर, एक अत्यंत महत्त्वाची भूमिका निभावते आहे. सन २०१२ हे पहिले वर्ष होते, जेव्हा गुरुमाईंच्या जन्मदिनी, जगभरातील कुठल्याही स्थानी असलेल्या सिद्धयोग्यांना, गुरुमाईंचे दर्शन वेबसाइटवर घेणे शक्य केले गेले. त्या वर्षी जन्मदिवसाच्या उत्सवादरम्यान, नियमित कालांतराने संपूर्ण दिवसभर श्रीगुरुमाईंचे श्री मुक्तानंद आश्रमातील व्हिडिओ पोस्ट केले गेले—श्रीगुरुमाई भगवान नित्यानंद मंदिरात पूजा करत असताना. . . नित्यानंद सरोवराभोवती पायी फिरत असताना. . . महोत्सव सत्संगात नामसंकीर्तन करत असतानाचा व्हिडिओ. . .

जगभरातील शेकडो कृतार्थ सिद्धयोग्यांनी त्या व्हिडिओज्‌ना लिखित स्वरूपात प्रतिसाद दिला. सगळ्यांनी या तत्काळ मार्गाने उपलब्ध झालेल्या गुरुमाईंच्या सान्निध्याच्या आनंदाचे आणि त्यांच्या दर्शनाच्या रूपांतरणकारी परिणामाचे वर्णन केले. त्याचे एक उदाहरण सांगायचे झाल्यास : न्यूयॉर्क शहरातील एक महिला तिच्या कामाच्या ठिकाणी जाण्यासाठी नेहमीच्या प्रवासी ट्रेनची वाट पाहत होती. तिला ही खंत होती की, गुरुमाईंचा जन्मदिवस तिला अशा प्रकारे व्यतीत करावा लागतो आहे. मग तिने तिच्या मोबाईलवर सिद्धयोगाची वेबसाइट उघडली—आणि नित्यानंद सरोवराजवळ तासाभरापूर्वीच काढलेला गुरुमाईंचा व्हिडिओ पाहून ती मंत्रमुग्ध झाली. क्षणभरात ती महिला तिच्या श्रीगुरूंच्या सन्निध होती. लगेचच ती प्रवासाच्या आपल्या मानसिक स्थितीतून बाहेर पडून आनंदाच्या व प्रसन्नतेच्या स्थितीमध्ये गेली. आता ती स्वतःला तिच्या कामाच्या दिवसाप्रति सहजसुंदरतेने समर्पित करू शकत होती—जेव्हाजेव्हा तिला थोडा मोकळा वेळ मिळेल, तेव्हा सिद्धयोग वेबसाइटला भेट देऊ शकत होती.

गेल्या काही वर्षांदरम्यान, विशेष दिवसांसाठीच्या वेबसाइटच्या कार्यांत विस्तार झाला आहे. मी तुम्हाला याचे स्मरण करून देऊ इच्छितो की, सिद्धयोग वेबसाइट दररोज पाहत राहणे ही एक अतिशय उत्तम संकल्पना आहे—एखाद्या मंगलमय दिवशी तर अनेकदा. या वर्षी गुरुमाईंच्या जन्मदिवसाच्या उत्सवादरम्यान मी वेबसाइट पुन्हापुन्हा पाहत राहणार आहे.

आनंदाने, प्राचुर्याने आणि माधुर्याने भरलेल्या ‘आनंदमय जन्मदिवसा’च्या या महिन्यात तुम्हाला अपरिमित शांती आणि सुख लाभावे, ही हार्दिक शुभेच्छा!

आदरपूर्वक,
पॉल हॉकवुड

© २०२० एस. वाय. डी. ए. फाउंडेशन®. सर्वाधिकार सुरक्षित.

---

[१] गुरुमाई चिद्विलासानंद, “The Origin of Birthday Bliss” ‘जन्मदिवस आनन्दोत्सव का उद्‌गम’ मधून उद्धृत [मराठी भाषांतर], सिद्धयोग मार्गाची वेबसाइट, https://staging.syda.net/gurumayi-birthday-bliss/origin.